**ठळक बातम्या**

- आठव्या वेतन आयोगाची स्थापना करायला केंद्र सरकारची मंजुरी
- छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार
- इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यंदाच्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे प्रमुख अतिथी
- अभिनेता सैफ अली खानची प्रकृती स्थिर, आरोपीच्या शोधासाठी पोलिसांकडून १० पथकांची स्थापना

  **आणि**

- भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही सिंधू, सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><><>**

केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना करायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. विद्यमान सातव्या वेतन आयोगाचा कालावधी पुढच्या वर्षी संपणार आहे. तोपर्यंत या वेतन आयोगाच्या शिफारसी प्राप्त होतील, अशी माहिती, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. आयोगाचे अध्यक्ष आणि २ सदस्यांची नेमणूक लवकरच होईल, असंही ते म्हणाले.

**होल्ड -- बाइट -- अश्विनी वैष्णव**

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघानं केंद्र सरकारच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे. केंद्र सरकार ज्या दिवसापासून या वेतन आयोगाची

अंमलबजावणी करेल त्यादिवसापासून राज्यातही याची अंमलबजावणी करण्याची मागणी महासंघानं केली आहे.

दरम्यान, श्रीहरीकोटा इथं सतीश धवन अंतराळ केंद्रात तिसरं लाँच पॅड उभारायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. चंद्रावर मानव पाठवण्याच्या इस्त्रोच्या आगामी मोहिमांसाठी याचा वापर होईल.

**<><><><><>**

भारतीय नौदलासाठी मध्यम पल्ल्याच्या, जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या पुरवठ्याकरता संरक्षण मंत्रालयानं आज भारत डायनॅमिक्स लिमिटेडशी करार केला. सुमारे ३ हजार कोटी रुपयांचा हा करार आहे. नौदलाच्या अनेक जहाजांवर ही क्षेपणास्त्र यंत्रणा बसवता येण्याजोगी असून, भविष्यात तयार केल्या जाणाऱ्या बहुतांश जहाजांवरही ही क्षेपणास्त्र यंत्रणा बसवली जाईल, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. भारताची संरक्षण क्षमता आणि अत्याधुनिक लष्करी तंत्रज्ञान वाढवण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांमधे, आजचा करार, हा एक मैलाचा दगड असल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारताची इलेक्ट्रॉनिक्स निर्यात ३५ पूर्णांक ११ शतांश टक्क्यांनी वाढून गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात ३ अब्ज ५८ कोटी डॉलर्स इतक्या उच्चांकावर पोहचली आहे. ही गेल्या दोन वर्षांतली उच्चांकी वाढ आहे. गेल्या वर्षी याच काळात २ अब्ज ६५ कोटी डॉलर्स इतकी निर्यात झाली होती.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बीजापूर जिल्हयात बस्तरच्या जंगलात सुरु असलेल्या चकमकीत किमान १२ माओवादी मारले गेले आहेत. बीजापूर जिल्ह्याच्या तेलंगणा

सीमेवरील दक्षिण बस्तर च्या जंगलात आज सकाळी ९ वाजल्यापासून ही चकमक सुरू होती. या जंगलात मोठ्या प्रमाणात माओवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर केंद्रीय राखीव पोलीस दल, कोब्रा बटालियन आणि जिल्हा राखीव सुरक्षा रक्षकांच्या पथकानं संयुक्तपणे ही कारवाई सुरु केली.

<><><><><>

७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो उपस्थित राहणार आहेत. २५ आणि २६ जानेवारी रोजी ते भारत दौऱ्यावर येतील. ऑक्टोबर २०२४ मध्ये राष्ट्राध्यक्षपदाची सुत्रं हाती घेतल्यानंतर त्यांची ही पहिलीच भारत भेट आहे. या भेटीत दोन्ही देशांच्या संबंधावर द्विपक्षीय चर्चा होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

प्रजास्ताक दिनाच्या निमित्त हवाई प्रदर्शन दाखवण्यासाठी भारतीय हवाई दल सज्ज आहे. सुमारे ४० विमानं कर्तव्यपथावर विविध कसरतींचं प्रदर्शन करतील. यंदा मिग २९, राफेल, सुखोई ३०, जग्वार, अपाचे, C-130 आणि C - 17 यासारखी लढाऊ विमानं सादरीकरणात भाग घेतील.

याशिवाय हवाई दलाची एक तुकडी सुद्धा कर्तव्यपथावर प्रदर्शन करेल. १४८ जवानांच्या या तुकडीचं नेतृत्व स्कान्ड्रन लीडर महेंद्र सिंह हे करणार आहेत.

<><><><><>

अभिनेता सैफ अली खान याची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली आहे. मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली असून अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. पहाटे मुंबईतल्या घरी अज्ञात इसमानं त्याच्यावर चाकू हल्ला केला होता. त्यात त्याला ६

ठिकाणी जखमा झाल्या होत्या, त्यातल्या २ जखमा खोल आहेत. त्यानंतर लीलावती रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. यात मणक्यातून चाकूचा तुकडा डॉक्टरांनी बाहेर काढला.

या प्रकरणी एका व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी १० पथकांची नियुक्ती करण्यात केल्याची माहिती पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी दिली.

दरम्यान, याप्रकरणी विरोधकांनी राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेवरुन सरकारवर टीका केली आहे. केवळ आश्वासन देण्याऐवजी कठोर कारवाई करण्याची हिम्मत मुख्यमंत्र्यांनी दाखवावी, असं आव्हान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिलं आहे.

देशातल्या सर्व महानगरांमध्ये मुंबई हे सर्वात सुरक्षित आहे. केवळ एका घटनेवरुन मुंबई असुरक्षित आहे असं म्हणणं चुकीचं असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. अशा आरोपांमुळे मुंबईची प्रतिमा खराब होते. मुंबईला आणखी सुरक्षित करण्यासाठी सरकार काम करत असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

चित्रपटाच्या माध्यमातून देशाची समृद्ध परंपरा देशातल्या नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये १० व्या अजिंठा-वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ते बोलत होते. देशाच्या कानाकोपऱ्यात चित्रपट महोत्सवांची वाढती संख्या, चित्रपट, संगीत, नाटक आणि नृत्य याविषयी लोकांना असलेली रुची दाखवून देत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

२५ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत चंद्रपूर इथल्या जवाहर नवोदय विद्यालयानं विजेतेपद पटकावलं आहे. आज नवी दिल्ली इथं केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते या विद्यालयाला फिरती ढाल आणि करंडक प्रदान करण्यात आला.

यावेळी संबंधित विभागांमधे प्रथम आलेल्या ७ नवोदय विद्यालयांनाही मेघवाल यांनी गुणवत्ता करंडक प्रदान केले. त्यात पतियाळा, कोझीकोड, जगतसिंगपूर, सहारनपूर, राजगीर, ईस्ट खांसी हिल - एक, आणि बारमेर इथल्या विद्यालयांचा समावेश आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आज आम आदमी पक्षाचे मनीष सिसोदिया, सौरभ भारद्वाज, गोपाल राय यांनी उमेदवारी अर्ज भरले. भाजपाचे हरिष खुराणा, मनजिंदर सिंग सिरसा, आशिष सूद आणि कपिल मिश्रा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. काँग्रेस नेते संदीप दीक्षित, अरीबा खान यांनीही आज उमेदवारी अर्ज भरले. या उमेदवारांसाठी विविध नेत्यांनी रोड शोचे आयोजन केलं होतं.

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने नऊ उमेदवारांची चौथी यादी आज जाहीर केली. काँग्रेसनही पाच उमेदवारांची चौथी यादी आज जाहीर केली. दिल्ली विधानसभेची निवडणूक ५ फेब्रवारी रोजी होणार आहे.

**<><><><><>**

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची अग्रनामांकित पी. व्ही सिंधूनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिनं जपानच्या मनामी सुझुझचा २१-१५, २१-

१३ असा पराभव केला. दिल्लीच्या इंदिरा गांधी इनडोअर स्टेडिअमवर झालेल्या या सामन्यात सिंधूनं सुरुवातीपासूनच आघाडी घेतली. सिंधूचा पुढचा सामना इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मरिस्का तांजग बरोबर उद्या होणार आहे. महिलांच्या दुहेरी सामन्यात भारतीय जोडी तनिषा क्रॅस्टो आणि अश्विनी पोनाप्पा यांचा जपानच्या जोडीनं पराभव केला.

पुरुषांच्या दुहेरीत भारतीय जोडी सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टीही उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत. महिला दुहेरी तनिषा क्रॅस्टो आणि अश्विनी पोनप्पा यांना मात्र जपानी खेळाडूंकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><><>

खो खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघानं मलेशियाला १००-२० असं दणदणीत पराभूत केलं. नवी दिल्लीत या स्पर्धा सुरू आहेत.

<><><><><>

भारतीय अंतराळ संशोधन संस्था-इस्त्रोनं महत्त्वाकांक्षी स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत अवकाशात सोडलेल्या चेसर आणि टार्गेट या दोन उपग्रहांना यशस्वीरित्या जोडलं. इस्त्रोनं बजावलेल्या या कामगिरीमुळे अशा प्रकारचे तंत्रज्ञान असलेला भारत हा अमेरिका, रशिया आणि चायना नंतरचा चौथा देश ठरला आहे. अवकाशात असलेले दोन वेगळे उपग्रह एकत्र जोडण्याचं तंत्रज्ञान अतिशय किचकट आहे.मात्र अंतराळ मोहिमांसाठी हे तंत्रज्ञान अतिशय महत्त्वाचे आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीनं अंतराळात सुक्ष्म गुरुत्वाकर्षणाच्या क्षेत्रात इंधन भरणं आणि इतर पायाभूत गोष्टीं करणं शक्य होणार आहे.

अवकाशात दोन उपग्रह जोण्याचं तंत्रज्ञान हे संपूर्णपणे इस्त्रोमध्ये विकसीत केलं आहे. याचा मोठा फायदा इस्त्रोच्या भविष्यातल्या मोहिमांना होणार आहे. त्यात

चंद्रयान ४ आणि भारतीय अंतराळ स्थानक उभारणीच्या मोहिमांचे समावेश आहे. उपग्रह जोडणीच्या यशस्वी चाचणीनंतर आता दोन उपग्रह वेगळे करण्याची चाचणी घेतली जाणार आहे. दोन्ही उपग्रह वेगळे झाल्यानंतर ते अवकाश मोहिमांसाठी जातील.